**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **२०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर भारत आणि रशियामध्ये सहमती.**
2. **भारतीय रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरामध्ये पाव टक्का कपात.**
3. **जागतिक मृदा दिनी सेंद्रीय शेती संदर्भात एक दिवसीय कार्यशाळेचे प्रादेशिक सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती केंद्र तसेच एनडीआरएफ अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुरात आयोजन.**
4. **'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत राज्याने केलेल्या विश्वविक्रमासाठी गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सकडून प्रमाणपत्र प्रदान.**

---------------------------------------------

व्लादिमिर पुतीन

२०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर भारत आणि रशिया मध्ये आज सहमती झाल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिली. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्यासोबत नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा झाल्यावर संयुक्त निवेदनात ते बोलत होते..........

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी २४ सेकंद)***

***इससे हमारा व्यापार और निवेश डाइवर्सिफाइड बैलेंस और सस्टेनेबल बनेगा और सहयोग के क्षेत्रों में नए आयाम भी जुड़ेंगे। मुझे पूरा विश्वास है कि आने वाले समय में हमारी मित्रता हमें ग्लोबल चैलेंज का सामना करने की शक्ति देगी और यही भरोसा हमारे साझा भविष्य को और समृद्ध करेगा।***

कृषी आणि खत निर्मिती क्षेत्रात आणखी सहकार्य करण्यावर दोन्ही देश तयार झाले आहेत. संयुक्तरित्या युरिया उत्पादनासाठी दोन्ही देशात प्रयत्न करणार असल्याचं ते म्हणाले. 'ऊर्जा सुरक्षा' हा दोन्ही देशांच्या संबंधातला महत्त्वाचा घटक आहे. याशिवाय नागरी अणूऊर्जेच्या क्षेत्रातही दोन्ही देश सहकार्य करत असल्याचं मोदी म्हणाले. दहशतवाद हा मानवतेवर हल्ला आहे. त्याच्या विरोधात काम करण्यासाठी दोन्ही देश तयार आहेत. शिवाय युक्रेनचा मुद्दा शांततापूर्ण मार्गान निकाली निघावा यासाठी होत असलेल्या सर्व प्रयत्नांना भारत पाठिंबा देईल, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, अन्न आणि ग्राहक सुरक्षा, कौशल्य विकास, क्रीडा यासह

विविध क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार झाले. त्यापूर्वी पुतीन यांचं आज सकाळी राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं. यावेळी पुतीन यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला. त्याआधी पुतीन यांनी नवी दिल्लीत राजघाटावर महात्मा गांधी यांच्या समाधी स्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी रशिया सतत आणि अखंड इंधन पुरवठा करण्यास तयार असल्याचं पुतीन यांनी म्हटलं आहे, तर रशियन नागरिकांसाठी ३० दिवसांच्या (ई- टुरिस्ट) व्हिसा आणि ३० दिवसांचा ग्रुप टुरिस्ट व्हिसा सुरु करण्यात येईल, असं मोदी म्हणाले.

-----------------------------------------------

रेपो दर

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरामध्ये पाव टक्के कपात केली आहे. यामुळे आता नवीन रेपो दर पाच पूर्णांक २५ शतांश टक्के झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज चालू आर्थिक वर्षाचा पाचवा पतधोरण आढावा जाहीर केला, त्यावेळी ही घोषणा केली. महागाईचा कमी झालेला दर आणि वाढलेली मागणी यांच्या आधारावर ही कपात करण्यात आली आहे. यामुळे गृहनिर्माण, वाहन आणि व्यावसायिक कर्जांसह विविध कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय इतर प्रमुख व्याजदरांपैकी 'स्थायी ठेव सुविधा दर', आता ५ टक्के झाला असून 'सीमांत स्थायी सुविधा दर' आणि 'बँक दर' ५ पूर्णांक ५ दशांश टक्के झाला आहे.

-----------------------------------------------

कोठडीत वाढ

दिल्लीत लाल किल्ल्याच्या जवळ झालेल्या बॉम्ब स्फोट प्रकरणातला आरोपी सोयबच्या NIA कोठडीत कोर्टानं १० दिवसांची वाढ केली आहे. या बॉम्ब स्फोटासाठी त्यांनं वाहन आणि इतर मदत पुरवल्याचा आरोप आहे.

-----------------------------------------------

वक्फ

वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सुरू झालेल्या 'उमीद' या पोर्टलवर एक लाख ५१ हजारांपेक्षा जास्त मालमत्तांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. वक्फ कायदा केल्यानंतर हे पोर्टल सुरू करण्यात आलं होतं आणि संबंधितांना वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. आज नोंदणी करण्याचा शेवटचा दिवस असून अद्यापही लाखो

मालमत्तांची नोंदणी झालेली नाही. पुढच्या तीन महिन्यांपर्यंत नोंदणी करणाऱ्यांवर मंत्रालयाकडून कोणताही दंड आकारला जाणार नाही किंवा कठोर कारवाई केली जाणार नसल्याचं आश्वासन रिजिजू यांनी यावेळी दिलं.

----------------------------------------------

अश्विनी वैष्णव

देशात रेल्वे अपघातांच्या संख्येत ९० टक्के घट झाल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. २००४ ते २०१४ यादरम्यान देशात १७१ रेल्वे अपघात झाले होते, मात्र सरकारच्या विविध उपाय योजनांमुळे त्यांचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

----------------------------------------------

मृदेचे आरोग्य

मृदेचे आरोग्य आपण जर व्यवस्थित राखले, रसायनाचा उपयोग न करता कचऱ्यापासून कंपोस्ट निर्मिती करून त्याद्वारे भाजीपाला निर्माण केल्यास आपण जे मातीला दिलं तीच माती आपल्याला भरभरून देईल अस प्रतिपादन 'नॅशनल डिझास्टर रिलीफ फोर्स एनडीआरएफ अकॅडमी'चे नागपूर येथील उपमहासंचालक डॉ.हरिओम गांधी यांनी केलं. केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधीन गोंडखैरी येथील प्रादेशिक सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती केंद्र तसच एनडीआरएफ अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आज 5 डिसेंबर जागतिक मृदा दिनी रोजी सेंद्रीय शेती संदर्भात एक दिवसीय कार्यशाळेच आयोजन आज सिव्हिल लाईन्स येथील एनडीआरएफ अकॅडमी येथे करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

***(होल्ड बाईट - हरिओम गांधी २८ सेकंद)***

***मिट्टियां अगर हमारी अच्छी है तो बारिश का पानी अंदर जाएगा जिससे कि वाटर का लेवल बढ़ेगा। पेड़ पौधे जो कि हम ज्यादा से ज्यादा उनको प्रोटेक्ट करे और ज्यादा लगाए। आज के दिन हम 500 पेड़ लगा रहे हैं। अपनी एकेडमी के अंदर और इस पूरे साल में हम लोगों ने करीब 10,000 पेड़ लगाए हैं तो आज का दिवस हम सब लोगों को ये बताता है की हम जहाँ से आए हैं जो हमारी माँ है तो माँ का ध्यान कौन रखेगा एक बीटा हि रखेगां पूरे दिन जो भी कुछ करते हैं, उसमें सचेत रहें। कई कुछ ऐसा तो नहीं कर रहे हैं जिससे कि हम उसको नुकसान पहुंचा रहे हैं।***

याप्रसंगी ‘रीजनल सेंटर फॉर ऑरगॅनिक अँड नॅचरल फार्मिंग’ आर.सी.ओ.एन.एफ. नागपूरचे प्रादेशिक संचालक डॉ.अजय राजपूत उपस्थित होते. यावर्षी जागतिक मृदा दिना ची संकल्पना ही 'हेल्दी सॉईल फॉर हेल्दी फ्युचर' अशी असून त्याच अनुषंगान 'वन हेल्थ' संकल्पना केंद्र शासन राबवत असल्याचं आर.सी.ओ.एन.एफ.चे प्रादेशिक संचालक डॉ.राजपूत यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट -राजपूत २८ सेकंद)***

***NDRF एकेडमी एक बहुत ही अच्छा हमारा एक का ऑर्गेनाइजेशन है। भारत सरकार का उनके साथ मिलकर कोलोब्रेट करके एक प्रोग्राम किया जा रहा है। इसमे सारे किसानों को स्पेशली प्राकृतिक खेती का सोप्त कर रहे है, उनको बुलाया गया है। एफपीओस को बुलाया गया है कि वो ये बताएं कि ये जो है क्यों आज जरूरत है नेशनल फार्मिंग कि क्योंकि सबसे बड़ी चीज़ है वन हेल्थ अगर आपका सॉइल हेल्थ अच्छी होगी, प्लांट हेल्थ अच्छी होगी, मतलब खराब हेल्थ अच्छी होगी, दोनों की हेल्प ये मैन थीम है।***

---

मागेल त्याला सौर कृषीपंप

‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ या योजनेत राज्यानं केलेल्या विश्वविक्रमाचं प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. गिनीज बुकच्या प्रतिनिधींनी हे प्रमाणपत्र देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केलं. महावितरणन एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौरकृषीपंप स्थापन करण्याचा उच्चांक केला आहे. या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. या वेळी शेतकऱ्यांना होणाऱ्या लाभा बद्दल फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं.........

***(होल्ड बाईट -फडणवीस ३२ सेकंद)***

***सौरकृषीपंपामध्ये हि शेतकर्यांची लाईफ लाइन आहे. शेतीची लाईफलाईन आहे.आज आपण या महिन्यांमध्ये 45 हजार 911 पंप लाऊन गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये गेलोय आणि सर्वात महत्वाचं म्हणजे देशामध्ये ९ लाख पंप लागले त्यातले ७ लाख पंप ते महाराष्ट्राने लावले आहेत. आपण शेतकऱ्यांसोबतच इन्टेरॅक्शन देखील बघितलं. शेतकर् यांना दिवसा वीज मिळते आहे. लवकर वीज मिळते आहे. त्यामुळे शेतकर्यांमध्ये एक याबाबतीत अतिशय समाधान आहे आणि त्यासोबत आमचे जे सौर वाहिनीची जी योजना आहे. ती हि पुढच्या वर्षी डिसेंबर मध्ये आम्ही पूर्ण करू.***

---

वडेट्टीवार

महायुती सरकारच्या वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. सरकारन  आपल्या उपलब्धी मिरवल्या, पण महाराष्ट्राच्या जनतेच्या पदरी मात्र निराशाच आली आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे या सरकारन एक वर्षाच्या कामाची श्वेतपत्रिका अधिवेशनात सादर करावी, अशी मागणी त्यांनी केली. वडेट्टीवार म्हणाले की, सरकार आल्यानंतर शेतकरी आत्महत्या वाढल्या, पीकांना हमीभाव मिळत नाही, रस्त्यांची दुरवस्था आणि महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. कुपोषण, शैक्षणिक समस्या आणि प्रशासनिक ढिसाळपणा वाढल्याचा आरोपही त्यांनी केला. चंद्रपूर येथील बरांज कोळसा खाणीत नियमांचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात कोळसा उत्खनन आणि अवैध विक्री केली जात असल्याचे गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केले.

---------------------------------------------